<u>प्रेसनोट दिनांक २६/१०/२०१८</u>

## पुणे शहरातील विविध पोलिस ठाणे व नियंत्रण कक्ष येथील महीला कर्मचारी यांच्याशी वारंवार फोन करुन अश्लिल संभाषण करणा-या आरोपीस खडक पोलिस ठाणेकडुन अटक

----------------------------------------ooo----------------------------------------

खडक पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजि. क्रमांक ३८०/२०१८, भा.दं.वि.कलम ३५४(ड), १८६ या गुन्हयातील आरोपी प्रशांत शंकर मोरे, वय २८ वर्षे, रा.पी एम सी कॉलनी, शिवाजीनगर, पुणे यास दाखल गुन्ह्यात दिनांक २६/१०/२०१८ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपी हा पुणे शहरातील विविध पोलीस ठाणे येथे तसेच पोलीस नियंत्रण कक्ष, पुणे येथे वारंवार फोन करुन, महिला कर्मचारी यांचेशी अश्लिल संभाषण करीत असे. अशाचप्रकारे महिला पोलीस कर्मचारी यांचेशी अश्लिल संभाषण केलेप्रकरणी नमुद आरोपीविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे ०४ गुन्हे दाखल आहेत.

आज रोजी खडक पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजि. क्रमांक ३८०/२०१८, भा.दं.वि.कलम ३५४(ड), १८६ या गुन्ह्याच्या तपासादरम्यान यातील आरोपीचा शोध घेणेकामी आरोपीचा मोबाईल क्रमांक, सीसीटीव्ही फुटेज व बातमीदारांकरवी मिळालेल्या माहितीच्या आधारे पोना इम्रान नदाफ व पोशि महावीर दावणे यांनी तांत्रिकदृष्ट्या कौशल्यपुर्ण तपास करुन, नमुद आरोपी यास शिवाजीनगर भागातुन ताब्यात घेण्यात आलेले आहे. नमुद आरोपी हा गुन्हा करतेवेळी चोरीचे मोबाईल वापरत असल्याचे निष्पन्न झालेले असुन, त्याचेविरुद्ध मुंबई येथे देखील गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झालेली आहे.

सदर कामगिरी श्री रविंन्द्र सेनगांवकर, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-१, पुणे शहर, श्री. प्रदीप आफळे, सहायक पोलिस आयुक्त, फरासखाना विभाग, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली खडक पोलिस स्टेशनचे श्री. राजेंन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, श्री. विजयकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि श्री. वैभव पवार, सपोनि श्री. उमाजी राठोड, सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी मिना तडवी, महीला पोलिस उपनिरीक्षक व त्यांचे सहकारी कर्मचारी, इम्रान नदाफ, पो नाईक ७५७१, महावीर दावणे, पो शि ८८२९ यांनी केलेली आहे.